# विद्यापीठाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन, ऑफलाईनची लिंक

## ५८० अभ्यासक्रमांच्या परीक्षा; ७५ हजार विद्यार्थी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाने अंतिम वर्ष शेवटचे सत्र परीक्षांच्या तारखा जाहीर केल्या आहेत. त्या अनुषंगाने विद्यार्थ्यांसाठी ऑफलाईन, ऑनलाईन परीक्षेची फॉर्म भरण्याची लिंक विद्यापीठ संकेतस्थळावर दिली आहे.

विद्यापीठ परीक्षा विभागाकडून अंतिम वर्ष शेवटचे सत्र, बॅकलॉगच्या परीक्षा ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने घेण्यासाठी तयारी वेगाने सुरू झाली आहे. त्यानुसार सर्व नियमित अभ्यासक्रमांच्या परीक्षा १० ऑक्टोबर व बॅकलॉगच्या परीक्षा १ ऑक्टोबरपासून सुरू होणार आहेत. अंतिम वर्षाचे शेवट सत्र व बॅकलॉग मिळून ५८० हून अधिक अभ्यासक्रमांच्या परीक्षा घेतल्या जाणार आहेत. विद्यापीठ कार्यक्षेत्रातून ७५ हजारांहून अधिक विद्यार्थी परीक्षेला बसणार आहेत.




विद्यापीठाच्या संकेतस्थळावर लिंकवरील फॉर्ममध्ये विद्यार्थ्यांनी ऑफलाईन, ऑनलाईन परीक्षा देण्याबाबतची माहिती भरावी. अंतिम वर्ष शेवटच्या सत्रास बसणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याने त्यांचा ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांक महाविद्यालय, अधिविभागामार्फत विद्यापीठाच्या अधिकृत संगणकप्रणालीत अपडेट करण्याचे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी केले आहे.